


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६८१. वा | सोमवार | दि. १२ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ पंडित व डॉ तडस यांची चौकशी का होत नाही ?

# जिल्हा सामान्य रुग्णालय भ्रष्टाचार प्रकरणी प्रमाणाबाहेर सारवासारव...

## सामान्य रुग्णालय करोडो रुपये भ्रष्टाचार प्रकरणाची चौकशी गुलदस्त्यात...

**पोस्टमार्टम ६४**

**जनसंचलन/ बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात गेल्या अनेक वर्षांत झालेल्या बेबंद भ्रष्टाचाराच्या विरोधात अद्यापपर्यंत तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.प्रेमचंद पंडित व डॉ. नितीन तडस यांचीही चौकशी होणे गरजेचे आहे. कारण त्यांच्याच नाकाखाली हा बेबंद भ्रष्टाचार हो होता. परंतु या भ्रष्टाचारासंदर्भात या जिल्हा शल्यचिकित्सकांची काहीही चौकशी होताना दिसून येत नाही. तत्कालीन भांडारपाल प्रकाश बोथे यांना भांडार विभागातील भ्रष्टाचार प्रकरणी निलंबित करून या प्रकरणातून पंडित व तडस यांच्यासारख्या मोठ्या माशांना वाचवण्याचा प्रयत्न तर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून होताना दिसून येत नाही ना, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. सर्वसामान्य, गोरगरीब व गरजू नागरिकांना चांगली आरोग्य सुविधा देण्याच्या उद्देशाने कार्यरत बुलढाणा जिल्हा रुग्णालय हे अनेक वर्षांपासून भ्रष्टाचाऱ्यांसाठी हक्काचे कुरण बनले आहे. या ठिकाणी येऊन गेलेल्या अनेक अधिकाऱ्यांनी या ठिकाणी यथेच्छ भ्रष्टाचार गेला व मलिदा लाटला. भांडार विभाग असो की कॅशबुक विभाग, प्रशासनिक विभाग असो की, बाह्य रुग्ण विभाग या सगळ्या ठिकाणी एक तर अनागोंदी अन्यथा भ्रष्टाचार याशिवाय आपल्याला काहीही दिसून येणार नाही. या ठिकाणी आज-वर अनेक जिल्हाशल्यचिकित्सक येऊन गेलेत. यातील बहुतांश जिल्हा शल्यचिकित्सकांनी जिल्हा रुग्णालयात बोकाळलेल्या भ्रष्टाचाराचा यथेच्छ स्वाद चाखला. भांडारपाल प्रकाश बोथे असो की, तत्कालीन रोखपाल पी. के. माळी. या सर्वांनी जिल्हा शल्यचिकित्सकांशी सातत्याने अर्थपूर्ण संबंध प्रस्थापित केले. ही संपूर्ण भ्रष्टाचाराची मालिका प्रामुख्याने दोन जिल्हा शल्यचिकत्सकांच्या कार्यकाळात सर्वादिक हिट ॲण्ड हॉट ठरली. हे दोघे जिल्हा शल्यचिकित्सक म्हणजे डॉ. पंडित व डॉ. तडस. यामध्ये काही प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सकांचाही मोठा हात आहे. या दोघाही जिल्हा शल्यचिकित्सकांनी येथील भ्रष्टाचाऱ्यांशी उघडपणे हातमिळवणी करून स्वतः च्या केवळ तुंबड्या भरण्याचे काम केलेले आहे. कॅशबुकात खाडाखोड करून जो काही कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे, त्याला जबाबदार असण-ारे पी. के. माळी यांची कुठलीही चौकशी तत्कालीन या दोघा जिल्हा शल्यचिकित्सकांनी करण्याची तसदी घेतली नाही. हे माळी महाशय प्रचंड भ्रष्टाचार करून आज नामानिराळे झालेले आहेत. त्यांच्या सेवाकाळात बोकाळलेल्या भ्रष्टाचारामुळे खरे तर त्यांना त्यांच्या सेवेकाळातील क्लियरन्स मिळायलाच नव्हते पाहिजे. मात्र, त्यांना पूर्ण क्लियरन्स मिळाला. ज्यामुळे ते आज सेवानिवृत्तीचे सुखी जीवन जगत आहेत.

उर्वरित पान २ वर



डॉ . प्रेमचंद पंडित | डॉ. नितीन तडस | रोखपाल पि.के.माळी

**तत्कालीन व सेवानिवृत्त महोदय यांनी यांच्या कार्यकाळात गाजवलेली सर्व अफरातफर प्रकरणाची जंत्री (पुरावे) सिटी न्यूजकडे उपलब्ध**

**बुलडाणा आमदार संजुभाऊ गायकवाड यांनी दोन वेळा अधिवेशनात गाजवलेला ९९ कोटी रुपये व भाजपा प्रवक्ता विनोद वाघ यांनी कोट्यवधी रुपये भ्रष्टाचार प्रकरणाची तक्रारी आरोग्य विभागाकडे देऊनही अद्याप पर्यंत चौकशी कारवाई गुलदस्त्यात तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ प्रेमचंद पंडित व डॉ. नितीन तडस यांच्या कार्यकाळातील संबंधित असलेले इतर अधिकारी यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करून जमा केलेली संपत्ती / अपसंपदा याची उच्चस्तरीय चौकशी करून केलेल्या भ्रष्टाचाराची रक्कम व्याजासह वसूल करून त्वरित शासन तिजोरीत जमा करावी अशी मागणी तक्रारकर्ते यांनी केली आहे.**

# महिला सरपंचांचा भरसभेत अवमान भाजप आमदार संजय कुटेंविरुद्ध पोलिसांत तक्रार...

## भाजपचे आमदार संजय कुटे यांनी भर सभेत दलित महिला सरपंचाचा केला अवमान

**जनसंचलन/ संग्रामपूर**

भाजपचे आमदार संजय कुटे यांनी भर सभेत दलित महिला सरपंचाचा अवमान केला. यानंतर सभास्थळ सोडलेल्या सरपंचांनी तामगाव पोलिसांकडे तक्रार करून कारवाईची मागणी केली. जळगाव जामोद मतदारसंघातील विविध विकास कामांचे भूमिपूजन शनिवारी खा. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते पार पडले. यादरम्यान संग्रामपूर तालुक्यातील वरवट बकाल येथील एका पुलाचेही भूमिपूजन पार पडले. यावेळी जळगाव मतदारसंघाचे आमदार संजय कुटे यांची प्रमुख उपस्थिती होती. वरवट बकालच्या दलित महिला सरपंच संगीता इंगळे यांनी आपल्या भाषणात वरवट बकाल येथे कार्यान्वित डायलिसिस सेंटरवर स्थानिक सरपंचाचे नाव डावलल्याचा मुद्दा उपस्थित केला. मी दलित असल्यामुळे माझं नाव वगळण्यात आल्याचा थेट आरोप त्यांनी केला. यामुळे सभास्थळाचे वातावरण ता-पले. खा. प्रतापराव जाधव यांच्या समोरच हा आरोप केल्याने आ. संजय कुटे यांचा पारा चढला व त्यांनी महिला सरपंचांना भाषण थांबवण्याचे फर्मान दिले. यावर महिला सरपंचांनी भाषण आटोपते घेत संजय कुटे यांच्या बाजूला बसल्या. यावेळी खासदारांचे भाषण सुरु असतानाच आमदार कुटे यांनी सरपंच इंगळे यांना धारेवर धरलं , यामुळे सरपंच इंगळे सभेतून निघून गेल्या. सरपंच पदाला तुच्छ लेखून महिलेचा अवमान करणे आमदार कुटे यांच्या अंगलट येण्याची चिन्हे आहेत. आमदार कुटे यांच्या विरो-धात सरपंच इंगळे यांनी तामगाव पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत संजय कुटे यांनी मी दलित असल्याने, माझ्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणली आहे, असे सरपंच इंगळे यांनी म्हटले आहे. दरम्यान, आज रविवारी सकाळी विचारणा केली असता



हे प्रकरण चौकशीवर असल्याचेफ तामगाव पोलिसांनी सांगितले . आमदारांनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. रिपाइंचे सचिन खरात यांनी कुटे यांची भाजपातून हकालपट्टी करण्याची मागणी केली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ॲड.नाझेर काझी यांना राज्यसभेची उमेदवारी द्या जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीने घेतला ठराव...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाणा जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीची आढावा बैठक माजी मंत्री डॉ. राजेंद्रजी शिंगणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीत अजितदादा गटच खरा राष्ट्रवादी पक्ष असल्याचे व पक्षाचे घड्याळ चिन्ह देण्याचा निकाल निवडणूक आयोगाने दिल्याबद्दल अजितदादाचे अभिनंदन करून ॲड. नाझेर काझी यांचे पक्षातील योगदान बघता त्यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या कोट्यातुन राज्यसभेची उमेदवारी देण्यात यावी, असा ठराव तुकाराम अंभोरे पाटील यांनी मांडला. त्याला सर्वांनी अनुमोदन दिले. नुकत्याच होवू घातलेल्या राज्यसभेच्या निवडणूकीत महायुतीत एक जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीला सुटण्याची शक्यता आहे. ॲड. नाझेर काझी यांच्या नेतृत्वात बुलडाणा जिल्ह्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी बळकट करण्याचे काम ते सातत्याने करीत आहेत. खरं म्हणजे शाहु फुले आंबेडकर चळवळीचे सुरूवातीपासून पुरस्कर्ते आहेत. त्यामुळे सर्व जातीधर्माचे लोक त्यांचा




आदर करतात. ते उच्च शिक्षीत असून त्यांना उमेदवारी दिली तर विदर्भाला न्याय देण्यासोबतच मुस्लीम समाजाला सुध्दा न्याय दिला जाईल. त्यामुळे ॲड. नाझेर काझी यांना उमेदवारी देण्यात यावी असा ठराव करून पक्षाकडे पाठविण्यात आला, त्या सोबतच छत्रपती शिवाजी महाराज जयंती पक्षाच्या वतीने स्वराज्य सप्ताह म्हणून साजरा करण्याचे ठरलेले आहे. त्याचे नियोजन करण्यात आले. प्रत्येक तालुका अध्यक्षांनी बुथ कमिट्या व इतर कामाचा आढावा दिला. त्या सोबतच तुकाराम अंभोरे पाटील, मनोज दांडगे, नंदाताई पाऊलझगडे, यांची नियोजन समितीवर निवड झाल्यामुळे सत्कार करण्यात आला. बैठकीच्या सुरूवातीलाच पक्षाचे प्रथम अध्यक्ष दिवंगत ॲड. ज्योतीराव राऊत यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. सदर बैठकीला डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्यासह तुकाराम अंभोरे पाटील, नंदाताई पाऊल झगडे, गंगाधर जाधव, आत्माराम कायंदे, रामभाऊ जाधव, पुनमताई राठोड, मनिष बोरकर, देशमुख, विद्यार्थी अध्यक्ष गजानन लाहडकार, यांच्यासह सर्व तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निलेश देठे यांनी केले.

# पान १ वरुन तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ पंडित व डॉ तडस

ज्या व्यक्तीला भ्रष्टाचार प्रकरणी गजाआड करावयास पाहिजे तो व्यक्ती आज सेवानिवृत्तीचा काळ मजेत घालवतोय. ही सगळी कृपा या दोन जिल्हा शल्यचिकित्सकांशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. दुसरीकडे बोथे यांच्या कार्यकाळात तर भांडार विभागात प्रचंड भ्रष्टाचार झालेल्याची तक्रारी आहेत. कागदोपत्री जेव्हढ्या उपकरणांची खरेदी करण्यात आलेली आहे, त्यातील बरेचसे साहित्य, औषधी व उपकरणे जिल्हा रुग्णालयात पोहोचलीच नाही. परंतु कोण्याही जिल्हा शल्यचिकित्सकाने यासंदर्भात चौकशी करण्याची तसदी घेतली नाही. सर्व अधिकारी हे स्थितिशील असल्याचे दिसत आहे. कारण कोणालाही हा भ्रष्टाचार निपटून काढण्याची गरज वाटत नाही. या ठिकाणी प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार करून गबर झालेल्या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात बेनामी संपत्ती अर्जित केली आहे. हा पैसा विविध प्रकाराने त्यांनी जिरवण्याचे काम केलेले आहे. त्यात मग जास्तच संकट आलं तर वाचवायला राजकीय मंडळी आहेतच. स्वच्छ राजकारणाच्या बाता मारणारे लोकप्रतिनिधीच आज भ्रष्टाचाऱ्यांच्या पाठीशी उभे राहून भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे असे म्हणत त्यांना वाचवण्याचे काम करीत आहेत. आज केवळ पी. के. माळी यांना जिल्हा रुग्णालयात हजर करण्यासाठी पोलिसांना पत्र देण्याचे काम होत आहे, परंतु त्याच वेळी तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पंडित व डॉ. तडस यांना पि. के. माळी यासंदर्भात कोणी विचारणा का केली नाहीत. रोखपाल पी.के. माळीं एव्हढेच ते देखील दोषी आहेत. तत्कालीन भांडारपाल प्रकाश बोथे यांना भ्रष्टाचार प्रकरणी नुकतेच निलंबित करण्यात आले आहे. परंतु बोथे यांच्यासोबतच या भ्रष्टाचाराच्या गाळात गळ्यापर्यंत रुतलेल्या तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ पंडित व डॉ तडस यांना का विचारणा होत नाहीए. केवळ एका अधिकाऱ्याला निलंबित करून करोडो रुपयांचा भ्रष्टाचार संपणार आहे की? या भ्रष्टाचाराला खतपाणी घालण्याचे काम जवळपास सर्वच अधिकाऱ्यांनी केलेले आहे. एकीकडे एव्हढी भयाण परिस्थिती असताना दुसरीकडे सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन सारखे जनतेचे प्रहरी सातत्याने भ्रष्टाचाराच्या विरोधात लढत आहेत. परंतु राज्याचे आरोग्य मंत्री असो की, मुख्य सचिव, आरोग्य संचालक संचलन, उपसंचालक असो की जिल्हाधिकारी सर्वच या भ्रष्टाचाराकडे ढिम्मपणे आणि हताशपणए पाहत आहेत. म्हणूनच भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई होण्यास एव्हढा विलंब लागत आहे. काहीही असले तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज मात्र कुठल्याही प्रकारच्या भ्रष्टाचाराच्या विरोधातच आहे. त्यामुळे आमचा संघर्ष हा आजही सुरूच आहे. कोणी कितीही मोठी यंत्रणा वापरून हा भ्रष्टाचार दडपण्याचा प्रयत्न केला तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज जनतेच्या बाजूने सातत्याने खंबीरपणे लढत राहणार आहे, हे या भ्रष्टाचाऱ्यांनी पुरते ध्यानात ठेवावे.

अजून बरेच काही पुढील भागात

# पॅंथर सेनेचे भागवत भाई साळवे यांच्या सह शेकडो कार्यकर्त्यांचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षात जाहीर पक्ष प्रवेश...

**जनसंचलन/ लोणार**

देशातील सत्तांतराचे नाटक बघता पक्षातील लोक त्यांच्या जाच्याला कंटाळून त्यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचे जिल्हा अध्यक्ष मा.नरहरी गवई यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन जाहीर पक्षप्रवेश केला असून लोणार तालुक्यामध्ये रिपाई आठवले पक्षाची ताकद मोठी झाल्याचे दिसून येते.पक्ष संघटन मजबूत करून गरजू नागरिकांशी संवाद साधून त्यांची सर्व प्रशासकीय कामे काळजीपूर्वक करण्याचे आव्हान तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)पक्षाच्या माध्यमातून नेहमी आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून मदत करण्याचे वचन मा.नरहरी दादा गवई यांनी यावेळी दिले.

या ऐतीहासिक पक्षप्रवेशाच्या वेळी प्रमुख उस्थितीमध्ये चिखली तालुका अध्यक्ष हिम्मतराव जाधव चिखली तालुका युवक उपाध्यक्ष तथा मिडिया प्रमुख बुलढाणा जिल्हा मयुरजी मोरे, रुपेश दादा गवई गणेश देशमुख,साठे ठेकेदार, राजहंस जावळे,यांच्या सह भागवत भाई



साळवे, अशोक साठे, मंगेश मोरे, शंकर खरात, प्रवीण लहाने, अनिल पवार, हेमाबाई पवार, सीता भोसले आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# चोरटे वाहन व बॅटरी सोडून फरार

**जनसंचलन / नांदुरा**



पोलिसांच्या रात्रगस्तीच्या वेळी मोबाइल टॉवरच्या तीन बॅटरी क चारचाकी वाहन घटनास्थळी सोडून दोन चोर फरार झाल्याची घटना फेब्रुवारीच्या रात्री घडली. नांदुरा पोलिस वडी-कोलासार भागात रात्री गस्त करीत होते. त्यांना वडी गावाजवळील मोबाइल टॉवरजवळ रात्री बारा वाजण्याच्या दरम्यान चोरटे चारचाकी वाहनासह दिसले. ते मोबाइल टॉवरच्या दिशेने पोलिस अंमलदार गेले असता चोट अंधराचा फायदा घेऊन पळून जाण्यात यशस्वी झाले. चोरट्यांनी चोरी करण्यास आणलेले चारचाकी वाहना (एमएच ०२ सीबी ७२६८), मोबाईल टॉवरच्या दीड लाख रुपये किमतीच्या तीन बॅटरी असा चार लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

# बुलडाणा जिल्हा.मलकापूर तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी व अल्पसंख्यांक विभागाची आढावा बैठक संपन्न

**जनसंचलन/मलकापूर**

मलकापूर तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी व अल्पसंख्यांक विभागा ची आढावा बैठक संपन्न व नविन कार्यकत्यांच्या नियुक्त्या.

आज दि. १०/०२/२०२४ वार शनिवार रोजी तालुका कार्यालय मलकापूर येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी चे प्रदेश सरचिटणीस मा. संतोष भाऊ रायपुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत, अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष मा. एम. डी. साबीर व बुलढाणा जिल्हा कार्याध्यक्ष मोहम्मद आसिफ शेख युवक राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बुलढाणा जिल्हा कार्याध्यक्ष जिया उलहक मक्तेदार यांच्या हस्ते शेख इमारन शेख अजीज यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी जिल्हा उपाध्यक्ष अल्पसंख्याक विभाग सलमान खान रईस खान यांना मलकापूर तालुका अध्यक्ष अल्पसंख्याक विभाग, लखनभाई कुरेशी, शहर अध्यक्ष अल्पसंख्याक विभाग , तसेच शहर अध्यक्ष मा. अरूणभाऊ अग्रवाल यांच्या हस्ते अज़िम कुरेशी,मुशरफ पठाण यांना शहर उपाध्यक्ष, तालुका अध्यक्ष सामाजिक न्याय विभाग मा. गौतम सावळे,ओ.बी. सी. शहर शहर अध्यक्ष मा. सुरेश भाऊ जावरे, तालुका युवक अध्यक्ष अशोक कोलते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी चे जिल्हा उपाध्यक्ष मा. एस. पी. संबारे सर यांच्या हस्ते,अनिलभाऊ अहिजा यांना जिल्हा सरचिटणीस.ही पदे देण्यात आली.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# गाव चलो अभियानाद्वारे मा.आ.विजयराज शिंदे यांनी साधला पान्हेरा ग्रामस्थांशी संवाद

**जनसंचलन/मोताळा**

आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपचे गाव गावं चलो अभियान सुरू आहे. मोताळा तालुक्यातील पान्हेरा येथे दि.१० फेब्रुवारी २०२४ रोजी भाजपा लोकसभा प्रमुख मा.आमदार विजयराज शिंदे यांनी प्रवासी कार्यकर्ता म्हणून पान्हेरा गावात विविध मान्यवरांच्या भेटी गाठी घेतल्या. सुरवातीला आदिशक्ती कान्हूसती मातेची पूजा आरती करून अभियानाला सुरवात केली. वाजत गाजत जय श्रीराम, नरेंद्रजी मोदी तुम आगे बढो, हर घर मोदी ,भारतीय जनता पक्षाच्या विजय असो अश्या अनेकविध घोषणा देत संपूर्ण गावातून पायीफेरी केली, या दरम्यान दुकानदार, किरकोळ विक्रेते, भाजीपाला विक्रेते ,राशन दुकानदार तसेच घरो घरी माता भगिनी नागरिकांच्या हातात पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांची ऐतिहासिक निर्णय दर्शवणारी माहिती पत्रके वाटली, गावातील बूथ प्रमुख, शाखाध्यक्ष, जेष्ठ कार्यकर्ता, यांच्याशी बूथ समिती मजबूत करण्या साठी सविस्तर चर्चा केली. तसेच विविध प्रतिष्ठित, राजकीय सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या घरी सदिच्छा भेटी देऊन संवाद साधला. तसेच रात्री गावातील श्री हनुमान मंदिर येथे ग्रामस्थांशी अनौपचारिक संवाद साधला. रात्री उशिरा पर्यंत भेटी गाठी घेऊन श्री हरिरामसेठ पुरोहित काकाजी यांच्या निवासस्थानी मान्यवरांसह स्नेह भोजन घेऊन रात्रीचा मुक्काम गावतच भाजपा जिल्हा सचिव श्री अशोक किंहोळकर यांच्या घरी केला. या अभियाना दरम्यान ग्रामस्थांनी ठीक ठिकाणी मा.आमदार विजयराज शिंदे यांचा स्वागत सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. गाव चलो अभियानाच्या निमित्ताने आज पान्हेरा येथील ग्रामस्थांशी निवांत वेळ देता, गावकऱ्यांच्या प्रेमाने अतिशय भारावलो असून प्रत्येक गाव खेड्यातील शेवटच्या घटका पर्यंत पोहचून जो उत्स्फूर्त जन आशीर्वाद व समर्थन मिळत आहे ही मोदी सरकारच्या ऐतिहासिक निर्णयाची पावती असल्याची प्रतिक्रिया



मा.आमदार विजयराज शिंदे यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलतांना व्यक्त केली आहे. या अभियाना दरम्यान समवेत भाजपा जिल्हा सचिव अशोक कींहोळकर, तालुका सरचिटणीस श्री डॉ आनंद रिंढे, किसान मोर्चा तालुकाध्यक्ष श्री महादेव शिराळ, तालुका सरचिटणीस नारायण देशमुख, श्री विश्वास वाघ, खेडी सरपंच श्री रामेश्वर पाटील, श्री चंद्रभान पाटील, श्री डिगांबर रहाणे, श्री गनेश गारवे, सीताराम वातळे, भिकुसेठ पुरोहित, श्री सुभाषसिंग राजपूत, धनराज रहाणे, कमलाकर गाळणे, रमेश धोंडू रहाणे, रमेश शिवराम रहाणे,सुरेंद्र जाधव,सागर राहणे यांसह मान्यवर असंख्य भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोमवार ला धनगर आरक्षण अंमलबजावणीसाठी बुलडाणा शहर बंदची हाक




**जनसंचलन/बुलडाणा**

महाराष्ट्रातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळावे यासाठी विविध स्तरातून प्रयत्न सुरू आहे. अनेक वर्षापासून यासाठी धनगर समाज आक्रमक आहे. विविध माध्यमातून धनगर समाज संघर्ष करत आहे. बुलडाणा येथील समाजसेवक नंदूभाऊ लवंगे गेल्या १३ दिवसांपासून आमरण उपोषणाला बसलेले आहेत. धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळावे, या प्रमुख मागणीसाठी नंदूभाऊ लवंगे यांनी आमरण उपोषणाला २९ जानेवारीपासून सुरुवात केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा समोर आमरण उपोषणाला बसले असून आजपर्यत शासन व प्रशासनाने कुठल्याही प्रकारची दखल घेतली नाही. इतक्या वर्षाच्या संघर्ष सुरू असून तोडगा निघालेला नाही, यात अनेक पिढ्यांचे नुकसान झालेले असून त्यामुळे आज महाराष्ट्रातील धनगर समाजाचा रोष वाढलेला आहे. या सर्व मागण्यांसाठी धनगर समाज बुलडाणा जिल्ह्याच्या वतीने सोमवार १२ फेब्रुवारी रोजी बुलडाणा शहर बंदची हाक देण्यात आली आहे. बुलडाणा शहरातून सकल धनगर समाजाच्या वतीने शक्ती प्रदर्शन करण्यात येणार आहे.

# माता व बालसंगोपन अधिकारी डॉ.मिलिंद जाधव तबला विषयात विशेष योग्यता श्रेणीत उत्तीर्ण



**जनसंचलन/बुलढाणा**

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई अंतर्गत सत्र नोव्हेंबर डिसेंबर २०२३ मध्ये संपन्न झालेल्या संगीत विषयांच्या परीक्षेचे निकाल नुकतेच जाहीर झाले असून त्यामध्ये प्रवेशिका प्रथम परीक्षेत तबला या विषयात स्वरविहार संगीत विद्यालय परिवाराचे सदस्य डॉ.मिलिंद जाधव हे विशेष योग्यता श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत..त्यांनी ही परीक्षा केंद्र क्रमांक २३९ महिला संगीत विद्यालय,बुलढाणा येथून उत्तीर्ण केली असून डॉ. मिलिंद जाधव हे जिल्हा परिषद बुलढाणा येथे माता व बालसंगोपन अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.स्वरविहार संगीत विद्यालय बुलढाणा येथे ते नियमित गायन व वादनाचे धडे घेत असतात. ते एक उत्तम वक्ता,एक तबला वादक,व उत्कृष्ठ गायक देखील असून ते एक प्रामाणिक व शिस्तप्रिय अधिकारी म्हणून सुपरिचित आहे. त्यांचा प्रशासनाचा देखील चांगला अभ्यास असून गायन वादनाची देखील कला ते जोपासतात.या यशामुळे त्यांचे जिल्हा परिषद प्रशासन तथा संगीत क्षेत्रामध्ये सर्वत्र अभिनंदन होत आहे..या परीक्षेसाठी त्यांना स्वरविहार संगीत विद्यालयाचे संचालक प्रा रविकिरण मोरे व प्रा अमोल दिशागज यांनी मार्गदर्शन केले.

# खासगी ट्रॅव्हलमधून ६० लाखांची बॅग अज्ञात चोरट्यांनी केली लंपास...

## राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेल विश्वगंगा येथील घटना

**जनसंचनल/ नांदुरा**

नांदुरा कुरियर सर्व्हिसच्या माध्यमातून खासगी ट्रॅव्हलमधून पैसे घेऊन जात असताना हॉटेलवर चहापाणी करिता उतरलेल्या इसमाची ६० लाखांची रोकड असलेली बॅग अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची खळबळजनक घटना ९ फेब्रुवारीच्या रात्री ९.३० वाजेदरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्रं. ५३ वरील वडनेर (भोलजी) नजीकच्या हॉटेल विश्वगंगा समोर घडली असून या प्रकाराने या परिसरात एकच खळबळ उडाली आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार कुरियर सर्व्हिसचे काम करणारे प्रमोद मोहनसिंह परमार वय ३० वर्षे रा. उत्तरी मेघवाल, वास हनुमान मंदिराजवळ, नेहवास ता. जि. सिरोही, (राजस्थान) हल्ली मुक्काम लक्ष्मी विहार अपार्टमेंट चौथा मजला अकोला यांनी नांदुरा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, ते रमेश कुमार अंबालाल कंपनी मुंबई यांच्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये असलेल्या शाखापैकी अकोला येथील शाखेमध्ये शाखा मॅनेजर विक्रमसिंग स्वरूपसिंग




मांगलियार यांच्या हाताखाली कुरियर सर्व्हिसचे काम करत असून माझ्याकडे कंपनीची रोख रक्कम घेऊन जाण्याचे काम असून दर ५ ते ६ दिवसांनी वेगवेगळ्या जिल्ह्यात कॅश घेऊन जात असतो. ९ फेब्रुवारी रोजी नेहमीप्रमाणे अकोलावरून जीपीएस मशीन लावलेल्या काळ्या रंगाच्या बॅगेत ६० लक्ष रुपये ठेवून आर संगीतम ट्रॅव्हल्सने निघालो रात्री ९.३० वाजेदरम्यान वडनेर (भोलजी) नजीकच्या हॉटेल विश्वगंगा येथे रोख रक्कम असलेली बॅग सीटवर शाल खाली ठेवून गाडीच्या खाली लघुशंकेकरिता उतरलो. तसेच चहा बिस्किट घेऊन खात बसलो असता. त्यादरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने गाडीतील ६० लाख रु. उडवून हॉटेलपासून एक किलोमीटर अंतरावर बॅगेतील रोख रक्कम काढून जीपीएस मशीनसह बॅग फेकून देत पोबारा केला. घटनेची माहिती मिळताच नांदुरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत नाकाबंदी केली. मात्र चोरटे पळून जाण्यात यशस्वी ठरले असून नांदुरा पोलिसांचे एक पथक आरोपींच्या शोधा करता रवाना करण्यात आले आहे. याप्रकरणी नांदुरा पोलिसात अज्ञात आरोपीविरुद्ध भांदवीच्या कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून या बॅग चोरी प्रकरणाचा पुढील सखोल तपास सपोनि नागेश जायले हे करीत आहे.

# गोळी घातली तरी दडपशाहीसमोर कधीही झुकणार नाही; महायुती सरकारला सुप्रिया सुळेंचा इशारा...



वृत्तसंस्था/बारामती

माझ्यावर गोळी जरी घातली, तरी दडपशाहीसमोर कधीही झुकणार नाही. लोकशाही वाचविण्यासाठी त्यांनी आमच्या गाड्या फोडल्या किंवा हल्ले केले, आमचा जीव घेतला तरी आम्ही घाबरणार नाही, असा इशारा महायुती सरकारला सुप्रिया सुळे यांनी दिला. बारामतीत माध्यमांशी बोलताना त्यांनी निखिल वागळे, असीम सरोदे यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध व्यक्त केला आहे. सुळे पुढे म्हणाल्या, देशात लोकशाही राहिलेली नाही, ही दडपशाहीच सुरु आहे. सुसंस्कृत महाराष्ट्र राहिलेला नाही, गुंडाराज सुरु झाला आहे. या गुंडगिरीच्या विरोधात पूर्ण ताकदीनिशी आम्ही लढणार आहोत. माझ्या विरोधात कोणीही उभे राहिले तरी हरकत नाही. लोकशाहीत विरोधक असायलाच हवा, फक्त तो दिलदार असावा इतकीच अपेक्षा आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात पाणी, बेरोजगारी व पिकांना न मिळणारा हमीभाव ही तीन प्रमुख आव्हाने आहेत. देशाच्या ग्रामीण भागातील लोकांची क्रयशक्ती घटताना दिसते असून ती वाढणे अर्थव्यवस्थेसाठी महत्वाचे आहे.पिकांना हमीभाव मिळत नाही तो वर ही क्रयशक्ती वाढणार नाही. बेरोजगारी बाबत केंद्र सरकारला अनेकदा सांगूनही फार फायदा होत नाही. हमीभावही मिळत नाही पर्यायाने ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचा विपरीत परिणाम होतो आहे. वकील, डॉक्टर, पत्रकार, लेखक, सामाजिक कार्यकर्त्यांवर राज्यात हल्ला होत आहे. लोकसभेत मला लोकांनी या बाबत विधेयक मांडण्यास सांगितले आहे, राज्यात गुंडाराज आहे, कोणीही याव कोणालाही गोळ्या घालाव्या, पिस्तूल म्हणजे तर चेष्टा झाली आहे, ठाणे, नागपूर आणि पुणे या तिन्ही शहरात ज्या पध्दतीने कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडलेली आहे, याला संबधित मंत्रीच जबावदार आहेत, मंत्र्यांचे राजीनामे देखील मागायचे नाहीत का, असा सवाल त्यांनी केलासुप्रिया सुळे म्हणाल्या की, काळा पैसा बंद करण्यासाठी केंद्राने नोटबंदी केली. त्यानंतर पेटीएम पुढे आले. आता सगळ्यात मोठा पैशांचा घोळ हा पेटीएमच्या माध्यमातून झाल्याचे आरबीआय म्हणते आहे. डिजिटल पैशातून मनी लॉंड्रिंग होऊ लागले आहे. संसदेत मी याबद्दल बोलले आहे. अशा पद्धतीने मनी लॉंड्रिंग होत असेल तर जुनाच चलनाचा व्यवहार बरा नव्हता का? असा सवाल सुळे यांनी केला.

## दोन महिन्यांवर लग्न; मात्र नियतीच्या मनात भलतंच, आनंदी आयुष्याचं स्वप्न रंगवत असतानाच तरुणीनं घेतला जगाचा निरोप

जनसंचलन/बुलडाणा

जिल्ह्यातील निमगाव येथे २० वर्षीय तरुणीचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याची घटना निमगाव तालुका नांदुरा येथे सात फेब्रुवारी रोजी संध्याकाळी घडली आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. निमगाव येथील रहिवासी पल्लवी पुरुषोत्तम दळवी असं या तरुणीचं नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या तरुणीला तिच्या घरासमोरील अंगणामध्ये दुपारच्या सुमारास उजव्या पायाला सर्पदंश केला. त्यामुळे तिला प्रथम उपचारार्थ नांदुरा येथील डॉक्टर उमेश बडे यांच्याकडे नेण्यात आले होते. प्रकृती अस्वस्थ असल्याने डॉक्टर उमेश बडे यांनी युवतीला सामान्य रुग्णालय खामगाव येथे रेफर केले. मात्र तेथे उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला. नांदूर येथील आयटीआय मध्ये शिक्षण घेत असलेली कुमारी पल्लवी ही आपल्या आई-वडिलांची एकुलती एक होती.दरम्यान पल्लवीचा २६ एप्रिल रोजी तिचा विवाह ठरला होता. मात्र अशा वेळीच तिने जगाचा निरोप घेतला आहे. या घटनेने निमगाव सह पंचक्रोशीत शोककळा पसरली असून मृतक तरुणीवर शवविच्छेदन केल्यानंतर ८ फेब्रुवारी रोजी सकाळी अकरा वाजता निमगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. एकंदरीत पल्लवीच्या जवळपास फक्त दोन महिने



लग्नाकरिता असताना आपल्या लग्नाचे आणि पुढील आयुष्याचे स्वप्न रंगवत होती. त्यात तिचा एकाएकी असा मृत्यू झाल्याने या मुळे संपूर्ण पंचक्रोशीसह गावात लगतच्या सर्व परिसरामध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. क्षणातच होत्याचं नव्हतं झाल्याने परिवारावर देखील मोठा आघात झाला आहे.

## रेतीची अवैध वाहतूक; महसूलने जप्त केले टिप्पर...

जनसंचलन/ देऊळगाव राजा

तालुक्यातील अंढेरानजीक रेतीची अवैध वाहतूक करताना एक टिप्पर जप्त करण्यात आले आहे. हे टिप्पर सध्या अंढेरा पोलिस ठाण्यात अटकाव करण्यात आले आहे. तालुक्यातून खडकपूर्णा नदी पात्रातून दररोज शेकडो ब्रास रेतीचे अवैध उत्खनन होत आहे. जिल्ह्यासह जिल्ह्याबाहेर या रेतीची वाहतूक करण्यात येते. दरम्यान, नायब तहसीलदार अस्मा मुजावर या अवैध वाळू प्रतिबंधक पथकात गस्तीवर असताना अंढेरा फाट्यानजीक पिवळ्या रंगाचे टिप्पर (क्र. एमएच-२८- एबी-९१९९) हे चिखलीच्या दिशेने जाताना दिसले असता त्याला अडवून त्यांनी चौकशी केली. त्यावेळी त्यात विनापरवाना साठवलेली चार ब्रास वाळू आढळून आली. टिप्पर चालक हर्षल सांडू देवकर (रा. भानखेड), यास विचारणा केली असता सदर टिप्पर सचिन देवीदास चित्ते (रा. निमगाव गुरू) यांच्या मालकीचे असल्याचे समजले. याप्रकरणी टिप्पर जप्त करून ते अंढेरा पोलिस ठाण्यात लावण्यात आले आहे. १० फेब्रुवारी रोजी ही कारवाई करण्यात आली

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम
ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

## दे. मही परिसरात जादा दराने गॅस सिलिंडरची विक्री

### एजन्सी चालकास ४५,८०० रुपयांचा दंड...

जनसंचलन/ देऊळगाव राजा

देऊळगाव राजा तालुक्यातील शिरे गॅस एजन्सीचे ग्रामीण वितरक यांना नियमबाह्यरीत्या ग्राहकांकडून अवाजवी अधिक रक्कम घेण्यासोबतच परस्पर बुकिंग करत काळ्या बाजारात जादा दराने विक्री केल्याप्रकरणी छत्रपती संभाजीनगर येथील येथील विभागीय एलपीजी विक्री प्रमुख यांनी कारवाई करत ४५ हजार ८४१ रुपयांचा दंड ठोठावला आहे. यासंदर्भात अंढेरा येथील ज्ञानेश्वर म्हस्के यांनी १४ जुलै २०२३ रोजी तक्रार केली होती. जवळपास सात महिन्यांच्या पाठपुराव्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने इंडियन ऑईल कंपनीकडून जळगाव खान्देश येथील सहायक विक्री प्रमुख सोमेल कुमार यांनी चौकशी अधिकारी म्हणून प्रकरणात चौकशी केली. देऊळगाव मही येथील शिरे इण्डेन ग्रामीण वितरक यांनी जादा दराने सिलिंडर दिल्याचे ग्राहकांच्या जबाबातून स्पष्ट झाले होते. यासोबतच देऊळगाव राजा तहसीलमधील पुरवठा अधिकारी चंदू इंगळे यांनी तक्रारीच्या अनुषंगाने देऊळगाव राजा तालुक्यातील मंडपगाव, बायगाव, सुरा, सरंबा, नागणगाव, सावखेड नागरे, चिंचखेड येथील ग्राहकांचे लेखी जबाब नोंदवले होते. त्यातही ८० ते १०० रुपये अधिक घेतले असल्याचे समोर आले होते. त्याअनुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकारी रीना बसैये यांनी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय एलपीजी प्रमुख यांच्याकडे अहवाल दिला होता. त्याअनुषंगाने १७ जानेवारी २०२४ रोजी विभागीय एलपीजी विक्री प्रमुखांनी संबंधित ग्रामीण एजन्सीला ४५ हजार ८४१ रुपयांचा दंड ठोठावला आहे. या कारवाईमुळे देऊळगाव मही परिसरात खळबळ उडाली आहे.